


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १३ फेब्रुवारी १९४६ अंक ७

भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें
—आदर्श ठिकाण—

## चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स्
## लिमिटेड

मॅनेजिंग एजंटसः—चितळे ब्रदर्स

रजिस्टर्ड ऑफिस-वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

## आशा
Asha

## सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

## दि आयडिअल इन्स्टिट्यूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| अधिकृत व विक्रीस | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ४,६२,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. घों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

## एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नि. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## विविध माहिती

### रेल्वेचे अद्यावत डबे

युद्धकाळीं ज्या कारखान्यांत बॉंबर विमानें तयार करण्यांत आलीं त्या लँकेशायरमधील प्रेस्टन विमान कारखान्यांत मुंबईच्या विजेच्या लोकल गाड्यांचे डबे बनत आहेत. सध्या १६ डब्यांच्या दोन गाड्या असे ३२ डबे तयार होत आहेत. त्यांची किंमत जवळ जवळ १ कोट रुपये होईल. कदाचित आणखीही ३२ अधिक डबे मागविण्यांत येतील. आपोआप लागणारीं व उघडणारीं दारें व डब्यांत कृत्रिम हवा खेळविण्याचे प्रयोग लवकरच करण्यांत येणार आहेत. हे डबे प्रथम १९४८ मध्यें उपयोगांत येतील. वैमानिक दळणवळणाशीं टक्कर देतां यावी म्हणून पुणें ते दौंड व इगतपुरी ते भुसावळपर्यंत विजेनें गाड्या चालविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. या योजनेचा खर्च अजमासे ७ कोट रुपये होईल.

### हिंदुस्थानांत रेल्वे इंजनांची उत्पत्ति

कांचनपारा येथील कारखान्यामध्यें रेल्वेचीं इंजनें तयार करण्यासाठीं लागणारीं यंत्रें खरेदी करण्यासाठीं रेल्वेच्या स्टँडिंग फायनॅन्स कमेटीनें ८२ लाख रुपये मंजूर केले आहेत. हीं यंत्रें स्वस्तांत स्वस्त व उत्तमांत उत्तम अशीं कोठल्याहि देशाच्या बाजारांत घ्यावयाची परवानगी कमेटीनें दिली आहे.

### साखर कारखान्यासाठीं ब्रिटिश यंत्रें

हैद्राबादचे मीर लाइक अली यांनीं ब्रिटिशांच्या जवळून २०,००,००० पौंड किंमतीचीं साखर व कागद कारखान्यास लागणारीं यंत्रें खरेदी केलीं आहेत.

दैनंदीन झीज व आजारानंतरची अशक्तता दूर करणारें टॉनिक




दि सूर्यकिरण फार्मसी लिमिटेड.

—महाराष्ट्र सोल एजंट—
मे. जयप्रकाश ॲण्ड को
२५५।४ सदाशिव, पुणें

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः–एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

### बंगालचे नवीन गव्हर्नर

बंगालचे भावी गव्हर्नर सर फ्रेडरिक जॉन बरोज आपल्या पत्नीसह लंडनहून विमानानें निघून कराचीस आले. सर फ्रेडरिकनीं आपणाबरोबर कुमारी फिलिस मिलर हिला असिस्टंट प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून आणली आहे, कारण सोलबरी कमिशन सीलोनला गेलें त्यावेळीं तिनें फार चांगलें काम केलें होतें.

### हिंदुस्थानासाठीं आंतरराष्ट्रीय कमिशन

कानडांतील निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या संस्थेपुढें भाषण करतांना मि. जॉन अर्बिक यांनीं सुचविलें कीं ब्रिटिश, कनेडिअन, व अमेरिकन इंजिनिअर, पेढीवाले, व औद्योगिक कारखानदार ह्यांचें एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत पाठवून त्यानें हिंदुस्थानांत उद्योगधंदे, शेतकी, पाटबंधारे व वहातुक ह्यांत काय सुधारणा करितां येईल याचे बेत तयार करावेत.

### चित्रपटपटूचा मृत्यू

स्लीम समर व्हील नांवाचा अमेरिकन चित्रपटपटू व डायरेक्टर नुकताच मृत्यु पावला. मृत्युपूर्वी ज्या चित्रपटांत त्यानें काम केलें तो त्याचा ६२७ वा चित्रपट होता।

### सर गुरुनाथ बेवूर यांचें उत्तर

पुण्याचे श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं पोस्टाच्या नोकरांच्या गाऱ्हाण्यासाठीं विधिमंडळांत तहकुबीची सूचना आणली असतां सर गुरुनाथ बेवूर म्हणाले कीं, २६,००० हंगामी नोकरांपैकीं फक्त ६,५०० नोकरांनाच फार तर कमी करावें लागेल. हे एकदम कमी न करतां हळू हळू कमी करण्यांत येतील. हिंदुस्थानांत बेकारी बोकाळली असतांना पोस्टाच्या नोकरांचे कमी केलेले पगार आतां त्यांना फार जाणवत आहेत हें त्यांनीं कबूल केलें.

### हिंदुस्थानांत पडणारे दुष्काळ

मेजर जनरल सर जॉन मॅगॉव, इंडिया ऑफिसच्या मेडिकल बोर्डाचे प्रेसिडेंट, यांच्या मताप्रमाणें हिंदुस्थानची लोकसंख्या जोंपर्यंत वाढत आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांत दुष्काळ रहातील. सर जॉन मॅगॉव यांनीं सुचविलें कीं, हिंदी लोकांची, ज्यामध्यें हिंदी स्त्रिया अधिक असतील अशी एक समिति नेमावी व या समितीनें हिंदुस्थानांत होणारा जीवांचा नाश व आर्थिक दैन्य यांची चौकशी करावी.

### हिंदुस्थानांतील पेट्रोलचा सांठा

सर चेहेराम कारंजिया, वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनचे अध्यक्ष, ह्यांच्या पेट्रोलचे रेशन वाढविण्यासाठीं केलेल्या तारेला जबाब देतांना, हिंदी सरकार ब्रिटिश सरकारशीं हिंदुस्थानचा पेट्रोल सांठा वाढविण्यासाठीं खटपट करीत आहे असें कळविण्यांत आलें. हिंदुस्थानांतील सैन्याला पेट्रोल कमी लागूं लागलें तरी वांचलेला सांठा जनतेला देण्याचा अधिकार हिंदी सरकारचा नसून ब्रिटिश सरकारचा आहे. त्यांतून गेल्या १५ महिन्यांत हिंदुस्थानांतील पेट्रोलचा सांठा ४० टक्के घटला आहे.


डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

सांड प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांड ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड. (चेंबूर, मुंबई)

पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोति चौक, पुणें.



# अन्न परिस्थितीवर असेंब्लींत चर्चा

सबंद जगांतच अन्नाचा भयंकर तुटवडा पडण्याचीं लक्षणें दिसत आहेत. हिंदुस्थानापुरतें पाहिलें, तर मद्रास प्रांतांतील परिस्थिति फारच वाईट आहे. कावेरी नदीचें कधीं न आटणारें पाणीहि आटलें आहे व मेतुर धरणावर पाण्यावर होणारें विजेचें उत्पादन बंद ठेवून शक्य तेवढें पाणी वाचविण्यांत येत आहे. सिंधमध्यें नेहमीं जास्त गहूं उत्पादन होतो, परंतु तोच प्रांत तक्रार करूं लागला आहे. पंजाबमध्यें धान्य जमा करण्याच्या पद्धतींत पुष्कळच सुधारणा होण्यास वाव आहे. इकडे, प्रत्यक्ष पुणें जिल्ह्यांत २२५ खेड्यांत अधिकृतरीत्या दुष्काळी परिस्थिति असल्याचें जाहीर झालें आहे व दुष्काळी कामें सुरू करून लोकांना मोफत मदत करण्याबाबत पुण्याच्या कलेक्टरास सरकारकडून सूचना मिळालेली आहे. बाहेरून धान्याची आयात मोठ्या प्रमाणावर झाल्याविना हिंदुस्थानांतील दुर्भिक्ष्य कमी होणार नाहीं, ही गोष्ट स्पष्ट असतांहि, पुरेसें धान्य आयात करण्याच्या कामीं हिंदुस्थान सरकारास यश मिळालें नाहीं. हिंदुस्थानातर्फे कंबाइंड फूड रिसोर्सेस बोर्डापुढें म्हणणें मांडण्यासाठी अन्न खात्याचे चिटणीस, सर रॉबर्ट हचिंग्ज हे अमेरिकेस गेले, परंतु त्यांच्या शिष्टाईचा उपयोग झाला नाहीं. सयामबरोबर झालेल्या तहनाम्यावर हिंदुस्थानतर्फे श्री. अणे ह्यांनीं सही केली, परंतु त्या देशाकडून धान्य मिळणें ही कंबाइंड फूड रिसोर्सेस बोर्डाच्या मर्जीची गोष्ट आहे.

### सर ज्वालाप्रसादांचे प्रयत्न

हिंदुस्थान सरकारचे अन्न मंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत आपल्या भाषणामध्यें सर्व परिस्थिति समजावून सांगितली. धान्याची सर्व प्रांतांत व संस्थानांत समान तत्त्वावर वांटणी व्हावी, असा सरकारचा प्रयत्न आहे, आणि सिंध, पंजाब व देशी संस्थानें हीं त्या योजनेच्या बाहेर राहणार नाहींत ह्याबद्दल दक्षता घेण्यांत येईल,असें ते म्हणाले. बंगालमधील दुष्काळाचे वेळीं लष्कराची मदत घ्यावी लागली तशी पाळी आल्यास ती मिळावी म्हणून लष्कर तयार ठेवण्यांत आलें आहे, असें त्यांनीं जाहीर केलें. लंडन व वॉशिंग्टन येथें हिंदुस्थानची जास्त धान्याबाबत मागणी पटवून देण्यासाठी स्वतःच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ नेण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. त्या शिष्टमंडळांत मद्रास मुंबई व म्हैसूर (ज्या भागांत दुष्काळ विशेष उग्र आहे) ह्यांचा समावेश होईल. मध्यवर्ती असेंब्लीच्या प्रमुख पक्षांनीं आपले प्रतिनिधि त्यांत पाठवावे, अशी त्यांनीं कळकळीची विनंति केली.

### दुष्काळास जबाबदार कोण ?

युद्धास प्रारंभ झाला, तेव्हां हिंदुस्थानचा बचाव करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारनें पत्करली, परंतु तें करीत असतांना आमची ही अशी शोचनीय अवस्था झाली आहे, असें सांगून मि. असफअली ह्यांनीं लॉर्ड लिनलिथगो ह्यांच्या साडेसात वर्षांच्या कारकीर्दीवर टीका केली. शेतकी तज्ञ म्हणून त्यांची शेतकी कमिशनच्या अध्यक्षस्थानीं नेमणूक झाली. दोन वर्षें हिंदुस्थानभर हिंडून कमिशननें मोठा रिपोर्ट तयार केला. त्यानंतर लॉर्ड साहेब व्हाइसरॉय झाले. सरकारनें ह्या मुदतींत शेतीसुधारणेसाठी काय केलें ? असा सवाल मि. असफ अली ह्यांनीं टाकला व अन्नपुरवठ्याची जबाबदारी सरकारचीच आहे, असें सांगितलें. आजच्या दुःस्थितीस कोण जबाबदार आहे ह्याची चर्चा करण्यास आतां सवड नाहीं; अन्नाच्या तुटवड्यावर उपाययोजना करण्यासाठी सर्वांनीं आपुलकीनें सहकार्य केलें पाहिजे, असा मि. सेन, फूड सेक्रेटरी ह्यांनीं चर्चेचा समारोप केला.

### उत्पादनांत वाढ

दुष्काळाची तीव्रता कमालीची भासूं लागली आहे तेव्हां अन्नपुरवठ्याच्या सरकारी योजना सत्वर आखल्या जाऊन त्या अंमलांत येणें अगत्याचें आहे. दोनच आठवड्यांपूर्वी हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि व कृषिमंत्रि, सर ज्वाला प्रसाद श्रीवास्तव आणि सर जोगेंद्रसिंह ह्यांनीं सरकारच्या अन्न व शेतकीविषयक धोरणाची घोषणा करून सर्वांस पुरेसें व योग्य दर्जाचें अन्न पुरवून त्यांच्या राहणीचें मान वाढविण्याचा सरकारचा उद्देश प्रकट केला. ह्या दोन्ही मंत्र्यांची व्यापक घोषणा व आजची प्रत्यक्ष परिस्थिति ह्यांची तुलना बोधप्रद होते. पाटबंधारे व धरणें वाढवून पिकाखाली जास्त जमीन तावडतोब आणणें, खतांचा पुरवठा करून दर एकरीं उत्पादन वाढविणें, भाजीपाला, फळें, मासे इत्यादींच्या उत्पादनांत वाढ करणें, इत्यादि मार्गांचा हिंदुस्थानभर एकजुटीनें अवलंब करण्याची तातडीची व्यवस्था झाली पाहिजे व सर्व प्रांतांना व संस्थानांना त्यांच्या व्यापक जबाबदारीची जाणीव करून देण्यांत आली पाहिजे. "अधिक धान्य पिकवा मोहीम" उत्साहानें जाहीर करण्यांत आली, परंतु कार्यक्षमतेनें ती यशस्वी करण्याकडे पुरेसें लक्ष पुरविण्यांत आलें नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांनीं केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर खऱ्या कळकळीनें आपलें काम करून जनतेचें सहकार्य मिळविलें पाहिजे. राष्ट्रीय सरकार स्थापन होईपर्यंत स्थगित करण्याची ही बाब नाहीं. व्हाइसरॉयांनीं महात्मा गांधी व मि. जिना ह्यांच्या सहकार्याची याचना केली आहे, ह्यावरून अन्नपरिस्थितीस सरकार किती महत्त्व देत आहे, हें दिसून येईल.

# ट्रस्टी व एक्झिक्यूटर कामासाठी नवी कंपनी

## महाराष्ट्र बँकेचा उपक्रम

बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या डायरेक्टरांनीं "दि महाराष्ट्र बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी कं. लि." अशी बँकेची सबसिडिअरी कंपनी स्थापन करण्याचा विचार चालविला आहे, असें समजतें. ही कंपनी स्थापन केल्यास, बँकेचे खातेदार व सर्वसाधारण जनता ह्यांस उपयुक्त अशी सोय उपलब्ध होईल, अशा विश्वासानें डायरेक्टर हें पाऊल पुढें टाकीत आहेत. महाराष्ट्रांत अशा तऱ्हेची, ह्या विशिष्ट कामासाठी स्थापन झालेली स्वतंत्र कंपनी अद्याप निघालेली नाहीं. कांहीं लिमिटेड कंपन्यांनीं आपल्या उद्देश पत्रकांत ट्रस्टी व एक्झिक्यटरचा धंदा करण्याची परवानगी घेऊन ठेवलेली असली, तरी तसा व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालू असल्याचें आढळून येत नाहीं.

### ट्रस्टी, एक्झिक्यूटर व ॲडमिनिस्ट्रेटर

मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याची मालमत्ता ही त्याच्या वारसांच्या मालकीची होते. परंतु त्यानें कायदेशीर विल अथवा मृत्युपत्र केलें असल्यास व त्यांत त्याच्या मालमत्तेची व्यवस्था कोणी पहावी हें नमूद केलेलें असल्यास अशा नमूद केलेल्या इसमास एक्झिक्यूटर असें म्हणण्यांत येतें. मृत्युपत्रांतील सूचना पाळून मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार मृत्युपत्रानें ज्यास

दिलेला असतो, तो त्या मृत्युपत्राचा एक्झिक्यूटर होय. एक्झिक्यूटरचें पहिलें काम मृत्युपत्र नोंदून तें शाबीत करून घेण्याचें असतें. मृत्युपत्राची शाबिती दर्शविणाऱ्या पत्रास प्रोबेट असें म्हणतात. हें प्रोबेट मिळविल्यानंतर, एक्झिक्यूटर मृताची मालमत्ता एकत्र जमा करून, त्याची मृत्युपत्राप्रमाणें वाटणी करण्याच्या मार्गास लागतो. मृत्युपत्र न करतां किंवा मृत्युपत्रांत एक्झिक्यूटरची नेमणूक न करतां मनुष्य मृत झाल्यास त्याच्या इस्टेटीची व्यवस्था पहाण्यासाठी कोर्टानें नेमलेल्या मनुष्यास ॲडमिनिस्ट्रेटर असें म्हणण्यांत येतें. एक्झिक्यूटर व ॲडमिनिस्ट्रेटर ह्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या ह्या साधारणतः एकाच प्रकारच्या असतात; एक्झिक्यूटरला मृत्युपत्रांतील सूचनांचे बाहेर जातां येत नाहीं; ॲडमिनिस्ट्रेटरला कायदेशीर तरतुदीपलीकडे बघण्याचें प्रयोजन नसतें. विश्वस्तपत्रांतील सूचनेप्रमाणें मालमत्तेची व्यवस्था पहाण्याकरितां ज्याचेकडे ती मालमत्ता सोपविलेली असते, त्यास ट्रस्टी असें म्हणतात. मृत्युपत्रान्वयेंहि ट्रस्टीची नेमणूक होऊं शकते, किंवा सार्वजनिक संस्थांच्या मालमत्तेची व्यवस्था ट्रस्टीकडे सोपविण्यांत येते. विश्वस्तपत्रांत विश्वस्तांचे म्हणजे ट्रस्टींचे अधिकार काय आहेत, हें बहुधा नमूद केलेलें असतें.

### व्यक्तींपेक्षा बँकांकडे काम कां सोपवावें ?

ट्रस्टी, एक्झिक्यूटर, ॲडमिनिस्ट्रेटर, इत्यादि कामें व्यक्तींपेक्षा बँकांसारख्या संस्थांकडे सोपविण्यांत अधिक सोय असते. व्यक्तींस जसें मरण येतें, तशी बँकांची स्थिति नसते; त्यांचें अस्तित्व सतत टिकतें. बँकांकडे अशा प्रकारचें बरेंच काम येत असल्याकारणानें, विशेष अनुभवाच्या किंवा विशिष्ट ज्ञानाच्या कामासाठी त्यांस तज्ञांची नेमणूक करतां येतें. अनेक ट्रस्टची व्यवस्था वेगवेगळ्या व्यक्तींकडे असण्यापेक्षा, त्या सर्वांची व्यवस्था बँकेकडे आल्यास, ती व्यवस्था अधिक कार्यक्षम होईल, हें उघड आहे. व्यवस्थेचा खर्चहि कमी होईल. अर्थात, ट्रस्टी, एक्झिक्यूटर किंवा ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून कामें पत्करण्यांत बँकेस मोठी जबाबदारी स्वीकारावी लागते. उदाहरणार्थ, ट्रस्टमधील सूचनेबाहेर बँकेचें वर्तन झाल्यामुळें ट्रस्टचें किंवा ट्रस्टचें ज्यास उत्पन्न मिळावयाचें, त्यांचें कांहीं नुकसान झाल्यास तें ट्रस्टीस भरून द्यावें लागतें. कोर्टामध्यें कोणतेंहि प्रकरण गेल्यास, ट्रस्टीची बाजू गौण आहे, असेंच गृहीत धरण्याचा प्रघात आहे. ट्रस्टसंबंधीं कांहीं शंका उपस्थित झाल्यास, त्यांचें कोर्टामार्फत निवारण करून घेणें ट्रस्टींस नेहमींच हितावह असतें. एक्झिक्यूटर किंवा ॲडमिनिस्ट्रेटर्चें कामींहि फारच दक्षता बाळगावी लागते.

### अमेरिकन बँकांचें अनुकरण

ट्रस्ट कंपनीचा उगम प्रथम अमेरिकेंत झाला. कालांतरानें ह्या कंपन्या ठेवी घेऊन कर्जेंहि देऊं लागल्या आणि त्यामुळें त्यांची तेथील बँकांशीं स्पर्धा सुरू झाली. आपला वाजवी व्यवहार ह्या कंपन्या पटकावूं लागल्या, हें पाहून अमेरिकन बँकांनीं ट्रस्ट कंपन्यांप्रमाणें ट्रस्टी, एक्झिक्यूटर वगैरे कामें स्वतः करण्यास प्रारंभ केला. इतर देशांतील बँकांनींहि त्यांचें अनुकरण केलें. हिंदुस्थानांतील कांहीं बँकांनीं हें काम करण्यासाठी स्वतःची विशिष्ट खाती निर्माण केली आहेत, तर कांहीं बँकांनीं त्यासाठी दुय्यम कंपन्या स्थापन केल्या आहेत. ह्या कंपन्यांचें शेअर भांडवल बँकांनींच घेतलेलें असतें व त्यांची व्यवस्था सर्वस्वी त्यांचेकडेच असते. बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें ह्या कामीं पुढाकार घेऊन आपली सबसिडिअरी कंपनी स्थापण्याचें योजिलें आहे, ह्याबद्दल तिचें अभिनंदन केलें पाहिजे. ट्रस्ट वगैरे कामें करण्यांत मिळकत चांगली असते व ती अव्याहत चालते, ह्या दृष्टीनें लोकांच्या सोईबरोबर बँकेची समृद्धी होण्यासहि ह्या नव्या उपक्रमाचा उपयोग होईल. महाराष्ट्रांत विश्वस्तपत्रें, इत्यादि गोष्टी लोकांच्या सरावाच्या झालेल्या नसल्या, तरी विश्वासास पात्र असलेली एक संस्था त्यांची व्यवस्था पहाण्यासाठी निर्माण झाल्यानें, असे व्यवहार वाढण्यास उत्तेजन मिळावें, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रीय जनतेची ही एक बहुमोल सेवा होणार आहे.

## ब्रिटिश सरकार ६०० कोटि रुपयें कर्ज सहज फेडूं शकेल.

### हिंदुस्थानांतील मालमत्ता विका !

" ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत धारण करीत असलेले सरकारी रोखे, कंपन्यांचे शेअर्स, व्यापारी मालमत्ता, इत्यादींची ब्रिटिश सरकारनें खरेदी करावी व पौंडांत त्यांची किंमत मालकांस देऊन टाकावी. ही सर्व जिंदगी नंतर हिंदुस्थानांत विकून तिचे बदली हिंदी चलनी नोटा घ्याव्यात. ह्या नोटा व त्यांच्या किंमतीचें स्टर्लिंगमधील येणें ही नंतर रद्द होतील. अशा रीतीनें हिंदुस्थानांत जिंदगी धारण करणाऱ्या इंग्रजांचें नुकसान न होतां ब्रिटिश सरकारास सुमारें ६०० कोटि रुपये उभे करतां येऊन तेवढें कर्ज फेडतां येईल. ब्रिटिश सरकारच्या सचोटीची कीर्ति कायम राखण्याच्या व हिंद-ब्रिटिश नातें सलोख्याचें टिकविण्याच्या दृष्टीनें ही योजना अत्यावश्यक ठरेल. हिंदुस्थानाचें देणें पूर्णपणें फेडणें हेंच ब्रिटनच्या अंतिम हिताचें आहे. "

:—श्री. मनु सुभेदार, एम. एल. ए.

### प्रांतांतील आर्थिक बाबींवर मध्यवर्ती सरकारची हुकमत

व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या एकूण सभासदांपैकी किमान तिघांनीं दहा वर्षें तरी हिंदुस्थानांत सरकारी नोकरी केलेली पाहिजे व एक तरी वकील असला पाहिजे, असें हिंदुस्थानचा घटना कायदा सांगतो. हिंदी राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांचें एक्झिक्युटिव्ह कौन्सिल बनवावयाचें म्हटल्यास, ह्या अटी अडथळा आणतील त्या दूर करण्यासाठी घटना कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येत आहे. त्यासाठी भारत मंत्र्यांनीं लॉर्डांच्या सभेंत एक बिल मांडलें आहे. कांहीं आर्थिक नियंत्रणें प्रांतांवर कायम ठेवण्याचा अधिकारहि दुरुस्त बिलानें हिंदुस्थान सरकारास दिला आहे. हा अधिकार किती काळ टिकावा, ह्याची तरतूदहि बिलामध्यें करण्यांत आली आहे.

### मागसलेल्या प्रांतांत गिरण्यांची स्थापना

पंजाब, बंगाल, बिहार इत्यादि औद्योगिक दृष्ट्या मागसलेल्या प्रांतांत भांडवल व गिरण्यांची यंत्रसामुग्री आकर्षिली जावी ह्या दृष्टीनें टेक्स्टाइल पॅनेलनें सूचना केल्या आहेत.


## दी आयुर्वेदीय अर्कशाला

लिमिटेड, सातारा.

**लोहिन:—** रक्तवर्धक करणारें औषध. ॲनिमिया व आजारानंतर येणारी अगर इतर कोणतेही कारणानें येणारी क्षीणता फारच जलद नष्ट केली जाते.

१ कोल्हापूर केंद्रः—गुजरी कोल्हापूर, २ हुबळी केंद्रः—मराठ गल्ली, हुबळी, ३ मुंबई केंद्रः—२१८ केळेवाडी, गिरगांव रोड, मुंबई.

## स्फुट विचार

### बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( वार्षिक सभा २४-२-१९४६ )

वरील बँकेस १९४५ साली १,६९,९२७ रुपये नफा झाला त्यामध्यें गेल्या वर्षाची बाकी ११,२७९ रुपये मिळविले म्हणजे नफा वाटणीस १,८१,२०६ रुपये होतात. चालू वर्षाच्या इनकम-टॅक्स व सुपर टॅक्ससाठी ७५,००० रुपयांची तरतूद करून व २०,००० रुपये फंडांत टाकून शेअर्सवर ५% करमाफ डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें प्रत्येकी ५ रुपये वाढाव्यानें ५ लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स विकले त्यावर मिळालेला ५०,००० रुपये वाढावा रिझर्व्ह फंडांत जमा करण्यांत आला. बोर्डाच्या शिफारसीस भागीदारांनीं मान्यता दिल्यावर रिझर्व्ह व कॉन्टिन्जन्सी फंड ह्यांतील रकम ३,००,००० रुपये होईल. १९४५ सालीं बँकेनें रत्नागिरी व कोपरगांव येथें नवीन शाखा व फैजपूर येथें पे-ऑफिस हीं उघडलीं. शाखांची संख्या आतां ९ झाली आहे. एक्झिक्युटर व ट्रस्टी हा व्यवहार करण्यासाठी 'दि महाराष्ट्र बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी कं. लि.' अशी बँकेची सबसिडिअरी कंपनी स्थापन करण्याचा डायरेक्टर्स विचार करीत आहेत. बँकेच्या नव्या इमारतीची पूर्व तयारी चालू आहे. बँकेचें एकूण खेळतें भांडवल १ कोटि, ५५ लक्ष रुपयांवर गेलें आहे. गेल्या वर्षी तें १ कोटि रुपये होतें. अशा रीतीनें बँकेची उत्कृष्ट प्रगति होत आहे.

---

### रशिया ब्रेटन-वुड्स करारांत सामील कां नाहीं ?

ब्रेटन-वुड्स करारास मान्यता देण्यापूर्वी त्याचा विचार करण्यासाठी रशियानें सवड मागून घेतली आहे. ह्याचा अर्थ, रशिया त्या संघटनेंत सामील झालेला नाहीं. फंड व बँक ह्या दोघांस लागणाऱ्या एकूण १८०० कोटि डॉलर्सच्या भांडवलापैकी २४० कोटि डॉलर्सचें भांडवल पुरविण्याची जबाबदारी मूळ योजनेंत रशियावर टाकण्यांत आली होती. अर्थात तेवढ्या रकमेनें भांडवल कमी पडलें तरी आवश्यक तें भांडवल ब्रेटन-वुड्स परिषदेच्या सभासदांनीं दिलें असल्याकारणानें मोनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक हीं चालू होण्यास कांहींच अडचण नाहीं. परंतु रशियासारखा महत्त्वाचा देश फंडाच्या व बँकेच्या कार्यक्षेत्राचे बाहेर राहिल्यानें त्यांच्या उपयुक्ततेस बराच बाध येण्याचा संभव आहे. नव्या संस्थांचें कार्य नीट चालावें, ह्यासाठीं सर्व सभासदांनीं आवश्यक ती आर्थिक माहिती प्रसिद्ध केली पाहिजे, असें ब्रेटन वुड्स करार सांगतो. व्यवहारांत किती चलन खेळतें आहे, सोन्याचा साठा किती आहे, आयात-निर्गतीचें प्रमाण काय आहे इत्यादि गोष्टी जाहीर करण्यास रशिया उत्सुक नाहीं. रशियाची परराष्ट्रीय व्यापाराची पद्धतहि इतर राष्ट्रांपेक्षा वेगळी आहे. अशा परिस्थितींत, ब्रेटन-वुड्स करारांत सामील होण्यानें आपला फायदा होईल का तोटा होईल, ह्याबद्दल रशियास शंका वाटत आहे. परंतु त्यामुळें करारांचें कार्यक्षेत्रहि मर्यादित झालें आहे. हिंदी मध्यवर्ती असेंब्ली करारास मान्यता देते किंवा नाहीं हें लवकरच समजेल.

### सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स ॲक्चुअरी असण्याचें कारण नाहीं

विमा कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल सरकारनें असेंब्लीस सादर केलें आहे त्यांत सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स हा स्वतः "क्वालिफाइड" ॲक्चुअरी असला पाहिजे ही सध्याच्या कायद्यांतील अट काढून टाकण्यांत आली आहे. सध्या हिंदुस्थानांत योग्य लायकीचे सुमारें १५ ॲक्चुअरी आहेत त्यांतून सुपरिंटेंडेंटच्या जागेसाठी योग्य मनुष्य मिळणें शक्य होत नाहीं, असें व्यापार-मंत्र्यांनीं सांगितलें. सध्यांचे सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स, श्री. वैद्यनाथन् हे मार्चमध्यें आपली जागा सोडत आहेत, त्यांचे जागीं बाहेरून "तज्ञ" आयात करणें इष्ट होणार नाहीं; स्वतः सुपरिंटेंडेंट हा ॲक्चुअरी नसला तरी ॲक्चुअरींच्या सल्लयानें विमा कायद्याची अंमलबजावणी तो करूं शकेल, असें विमा व्यवसायी लोकांचें म्हणणें आहे. त्याच आधारावर कायद्यांत वरील सुधारणा आतां सुचविण्यांत येत आहे.

---

### कांहीं बँकांजवळ ११ जानेवारी रोजीं फार चलनी नोटांचा साठा आढळला

चलनी नोटांचा कायदेशीरपणा नाहींसा करतांना हिंदुस्थान सरकारनें बँकांकडून कांहीं माहिती मागविली होती, तिचा खरेपणा तपासण्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदी बँका, एक्सचेंज बँका व इंपिरिअल बँक ह्यांत भेदाभेद केला काय असा प्रश्न श्री. मनु सुभेदार ह्यांनीं असेंब्लींत विचारला. त्यास फडणवीसांनीं खालीलप्रमाणें उत्तर दिलें:—सर्व बँकांकडून आलेले आकडे तपासणें रिझर्व्ह बँकेस अद्याप शक्य झालें नाहीं. ज्या बँकांनीं १०,००,००० रुपयांपेक्षां अधिक किंमतीच्या मोठ्या चलनी नोटा आपले जवळ असल्याचें जाहीर केलें, त्यांचे हिशेब तपासण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्यासंबंधांत हिंदी बँका व एक्सचेंज बँका ह्यांस सारखेंच लेखण्यांत आलें. कित्येक एक्सचेंज बँकांच्या हिशेबाच्या वह्या तपासण्यांत आल्या. इंपीरिअल बँक ही रिझर्व्ह बँकेची कायदेशीर एजंट असल्याकारणानें त्या बँकेस तपासणी लागू नव्हती. रिझर्व्ह बँकेकडून रिपोर्ट आला आहे, त्यावरून बँकांनीं जाहीर केलेली नोटांची रकम व त्यांच्या प्रत्यक्ष हिशेबांत दिसणारी रकम ह्यांत तफावत आढळली नाहीं; परंतु कित्येक बँकांजवळ ११ जानेवारी रोजीं नेहमीच्या मानानें फारच जास्त नोटा असल्याचें निदर्शनास आलें आलें आहे. अशा प्रकरणांची चौकशी चालू आहे.

---

### निर्गत व्यापारासाठी ब्रिटिशांचा प्रयत्न

युद्धापूर्वीच्या ब्रिटिश निर्गत व्यापारांत कापडाच्या गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीस महत्त्वाचें स्थान असे. १९३५ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें गिरण्यांची जेवढी यंत्रसामुग्री तयार झाली, तिच्या ५६% निर्गत झाली. १९४६ मधील उत्पादनापैकी ७२% उत्पादन निर्गत करण्याचा ब्रिटिश कारखानदारांचा निश्चय आहे. कापड व सूत ह्यांची निर्गत मोठ्या प्रमाणावर होऊं लागण्यास अद्याप अवधि आहे. १९४६ सालीं ब्रिटिश कारखान्यांत ४,७०,००० मोटारी तयार होतील, त्यांपैकी निम्म्या मोटारींची निर्गत केली जाईल. युद्धापूर्व ग्रेट ब्रिटनमध्यें तयार होणाऱ्या रेडिओपैकी फक्त २·६% रेडिओंची निर्गत होई, १९४६ सालीं उत्पादन व्हावयाच्या ८,७८,००० सेटसपैकीं ५०% सेट्स बाहेर देशीं रवाना होतील. २५,००,००० सायकलींच्या निर्मितीपैकीं निम्म्यांची निर्गत होईल. अपेक्षितकें उत्पादन होण्यांतील मुख्य अडचण कामगार व कोळसा ह्यांचा तुटवडा, ही होय. अँग्लो-अमेरिकन करारामुळें जागतिक बाजारपेठा अमेरिकेस खुल्या झाल्यावर ब्रिटिश कारखानदार अमेरिकन मालाशी कितपत स्पर्धा करूं शकतात, हें दिसून येईल.

### रशिया हिंदुस्थानाबरोबर व्यापार करण्यास तयार

लंडन येथील रशियाचे वकील म्हणाले:–" हिंदुस्थानची इच्छा असल्यास हिंदुस्थानबरोबर व्यापार करावयास रशिया तयार आहे. या बाबतींत कांहीं बोलणीं चालू आहेत का नाहीं हें मला ठाऊक नाहीं. परंतु ज्यांत दोन्हीं देशांचें कल्याण आहे, अशा गोष्टी घडवून आणण्यास रशियाची नेहमींच तयारी असते."

### रेडिओ लायसेन्स

डिसेंबर १९४५ मध्यें १६,६५४ लोकांनीं रेडिओचे लायसेन्स बदलून नवीन घेतले. आजपर्यंत इतके लायसेन्स कोठल्याहि एका महिन्यांत घेतले गेले नव्हते. या महिन्यांत एकंदर १९,२३६ लायसेन्स घेतले गेले व त्यांतील ३,५८२ नवे लायसेन्स होते. त्या महिनाअखेर खालसा मुलखांत एकंदर रेडिओ लायसेन्सची संख्या २,०२,८२९ झाली.

### मुंबई इलाख्यांत शेतांना ताली घालण्याचे प्रयोग

शेतांना ताली घातल्यामुळें मुंबई इलाख्यांत शेतीचें उत्पन्न २० ते ३० टक्के वाढलें असून त्यामुळें कडबा वगैरे वैरणींतही वाढ झाली आहे. ताली घातल्यामुळें जमीन वाहून जाण्याला आळा बसला असून जमिनींत ओल टिकून राहिल्यामुळें पिकांचा फायदा झाला. ताली घातल्यावर्षीं निम्मी जमीन धुपून जाण्याची थांबते आणि पांच वर्षांनीं हें प्रमाण एक दशांशावर येते. जमिनींत ओलावा राहिल्यामुळें उत्पन्न वाढतें आणि हें उत्पन्न दुर्जल कृषि पद्धतीनें पुष्कळच अधिक वाढवितां येतें. दुर्जल कृषि पद्धतींत मुख्यतः जमीन खोल नांगरून मग पेरणी करण्याची जरूर असते.

### हिंदुस्थानच्या व्यापारांत ब्रिटिशांची नफेबाजी

हिंदुस्थानच्या व्यापारांतील ब्रिटिशांच्या नफेबाजीला आळा घालण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक हिंदी काटकसर मंडळ नेमलें आहे. हें मंडळ हिंदी व्यापाऱ्यांच्या हिताचें रक्षण करून बोर्ड ऑफ ट्रेड व व्यापारी यांच्यामध्यें मध्यस्ताचें काम करील. अमेरिकन माल खरेदी करण्याचें हिंदी व्यापाऱ्यांशीं साधन नसल्याकारणानें ब्रिटिश व्यापारी हिंदी व्यापाऱ्यांच्या जवळून ऐशी टक्केपर्यंत नफा कसा पिळून काढतात हें बोर्ड ऑफ ट्रेडच्या नजरेस या मंडळानें आणलें. नफेबाजीचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. ब्रिटिश पत्र्यांचे व्यापारी हिंदी व्यापाऱ्यांच्या जवळून बाजार भावाच्या दुप्पट पैसे घेत. अखेर बोर्ड ऑफ ट्रेड मध्यें पडून पत्र्यांवर २० टक्के नफा घेऊन हिंदुस्थानांत डिलिव्हरी द्यावी असें ठरलें. हिंदुस्थान सरकार हिंदुस्थानांत खपणाऱ्या मालांच्या किंमतीवर नजर ठेवणारे व्यापारी प्रतिनिधी नेमीत आहे.

### नगर डि. अर्बन सें. को. बँक, लि.

वरील बँक दोन नव्या शाखा उघडीत आहे. कोपरगांव येथील शाखेचें उद्घाटन सोमवार, ता. ४ रोजीं प्रा. रा. वि. ओतूरकर ह्यांचे हस्तें झालें. बेलापूर रोड येथील शाखेचें उद्घाटन बुधवार, ता. ६ रोजीं सकाळीं ९ वाजतां झालें.

लहान मुलांकरितां **आर्को** गोड –एरंडेल– वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर







—: साठे बिस्किटें :—
खुसखुशी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.
——साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद गोकाक मिल्स १–३–४६ } २१–३–४६ } फिनले मिल्स १६–३–४६ ते ८–३–४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ५।२।४६ | बुधवार ६।२।४६ | गुरुवार ७।२।४६ | शुक्रवार ८।२।४६ | सोमवार ११।२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २६५०—० | २६५७—८ | २७४१—४ | २६६०—० | २७३७—८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४७५—८ | ४७५—० | ४६८—८ | ४६९—० | ४८६—० |
| २२२२-८; १७६२-१२ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२१०—० | २२१५—० | २१७५—० | २१९२—८ | २२२७—८ |
| ७०२; ५६६ | ९——० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६७५—० | ६७३—० | ६६०—० | ६५९—८ | ६६६—८ |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७०७—० | ७०८—८ | ७०४—० | ७१५—० | ७११—४ |
| ४४३–८; ३६० | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४५३—० | ४५२—० | ४३३—० | ४३७—० | ४४२—८ |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | ३३४—० | ३३२—० | ३२५—० | ३२५—० | ३३१—८ |
| ३३५; २८३-८ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३४०—० | ३४०—० | ३२८—० | २२९—० | ३३६—० |
| ३३७; २४३ | ४–०–० † | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३३९—० | ३३८—० | ३२६—० | ३२८—८ | ३३४—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—१३ | ४–१२–६ | ४–१०–६ | ४–९–६ | ४–१३–० |
| १७१०; १३-७-० | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७—७ | १७—७–० | १७—०–० | १७—१–० | १७—७–० |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३–६–६ | ३—६–६ | ३—४–६ | ३—६–६ | ३—७–६ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७४१—४ | ७४२—८ | ७३५—० | ७३५—० | ७४७—८ |
| २४३–८; २०६·८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | २४३—८ | २४२—० | २४२—० | २४१–१२ | २३९—४ |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५४—० | २५२–१२ | २५१—० | २५०—० | २५०—८ |
| ५९२–८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६२२—८ | ६२१—८ | ६१५—० | ६०७—८ | ६१७—८ |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४२—८ | ४२—५ | ४१—२ | ४१—७ | ४३—८ |
| | | | ३½% रोखे. | १०० | १०३—१ | १०३—३ | १०३–२–६ | १०३–३–६ | १०३—५ |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे.

सोमवार दि. ११–२–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१–११ | बरोडा | १६५—८ | आंध्रा व्हॅली | १८५०–० | अलकॉक | ४६६–४ |
| १९५१–५४ | १०१–११ | सेंट्रल | १०७–१२ | बॉम्बे ट्रॅम | १५८–० | बॉंबे स्टीम | ७७२–८ |
| १९५७ | १०१—८ | इंडिया | २३०—० | टाटा हायड्रो | २१८–८ | न्यू इंडिया | ९४—८ |
| १९५९–६१ | १०१—३ | इंपी० | २४०७–८ | टाटा पॉवर | १९८०–० | शिवराजपुर | ५८–१२ |
| १९६३–६५ | ९९–१२ | इंपी० | ६०६–४ | | | टाटा केमिकल | २४—६ |
| १९६६–६८ | ९९—१ | रिझर्व्ह | १५६—८ | | | टाटा ऑईल | ९१—० |
| १९७०–७५ | ९८—८ | युनियन | १२—० | | | | |

शुक्रवार, दि. १५।२।४६ ला बाजार बंद.

### पुणें सें. को. बँकेची मंचर येथें शाखा

पुणे सें. को. बँकेच्या मंचर येथील शाखेचा उद्घाटन समारंभ शनिवार, ता. ९ रोजीं प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या हस्तें झाला. मंचर हें गांव आंबेगांव तालुक्यांत असून, बटाटे, कांदे, वगैरेसाठी प्रसिद्ध आहे.

### महाराष्ट्र चेंबर ( मुंबई ) ची पुण्यांत सभा

महाराष्ट्र चेंबर ( मुंबई ) ची येती त्रैमासिक सभा गुरुवार, ता. १४ रोजीं पुणें येथें लॉर्ड रे म्यूझियमच्या सभागृहांत कॉमनवेल्थ इमारतीमध्यें सायंकाळीं ५ वाजतां बोलाविण्यांत आली आहे. चेंबरचे पुण्यांतील सभासद, श्री. वि. अ. पटवर्धन व श्री. पु. ग. मराठे ह्यांच्या कल्पनेचें हें फळ आहे. चेंबरची सभा मुंबईबाहेर भरल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

### गणेश बँक ऑफ कुरुंदवाड लि.

वरील बँकेचा रौप्य ज्युबेली महोत्सव समारंभ गुरुवार, ता. १४ रोजीं होणार आहे. त्यावेळीं श्रीमंत बाळासाहेब महाराज, राजेसाहेब कुरुंदवाड, ह्यांचे हस्तें बँकेच्या इमारतीची कोनशिला बसविण्यांत येईल.

# NOTICE.

One brand new Chevrolet motor goods truck damaged in accident will be sold by public auction on 20–2–46 in the office of the Sub-Divisional Officer Poona North Sub-Divn. Central Offices Poona. Engine and other parts have been dismantled and can be viewed at the Bombay Garage Poona's work shop at any time from 10 A. M. to 12 A. M. and 2 P. M. to 4 P. M. on working days excepting Saturdays. Conditions of sale can be seen in the office of the Sub-Divisional Officer, Poona North Sub-Dn. Central Offices during office hours.

S. K. Karandikar,
Executive Engineer,
Poona Division.

Poona.

## श्री. तवनप्पा ह्यांची मार्गदर्शक लेखमाला

### " योजना आखून पार पाडा "

गोदावरी, कृष्णा, कोयना, पंचगंगा, कावेरी, तुंगभद्रा वगैरे नद्या सह्याद्रि पर्वतांत उगम पावून कमी अधिक लांबचा प्रवास करून स्वतः अगर इतर नद्यांच्या द्वारें समुद्रास जाऊन मिळतात. मुंबई इलाख्यांत जे प्रमुख पाट बंधारे आहेत त्यांत नाशिक जिल्ह्यांतील गोदावरी पाटबंधाऱ्यांचा समावेश होतो हें खरें असलें तरी कृष्णेचे कऱ्हाडजवळील किरकोळ पाटबंधारे व सांगलीस होऊं घातलेलें कृष्णेचें धरण सोडून दिल्यास गोदावरी व कृष्णा ह्या नद्यांचा फायदा आंध्र प्रांतच करून घेत आहे. तें सुद्धां बेझवाड्याजवळील कृष्णेचें धरण व राजमहेंद्रीजवळील धवलेश्वराचें गोदावरी धरण यावरून वाहणाऱ्या एकंदर पाण्यापैकी शेंकडा ६–७ टक्केच. हें लक्षांत घेतां संपत्त्युत्पादनासाठी उपयोग न करितां किती पाणी आम्ही समुद्रास अर्पण करतों याची कल्पना करवत नाहीं. मद्रास सरकार निझामचे सरहद्दीजवळ गोदावरीस दुसरें धरण बांधणेसाठी 'गोदावरी प्रॉजेक्टस' आंखणेच्या इराद्यानें खास इंजिनीयर अमेरिकेच्या टेनेन्सी व्हॅली ॲथॉरिटी शिक्षण केंद्रास अभ्यासासाठी व परिशीलनसाठीं पाठविला आहे. ही योजना अमलांत आलेवर तें जगांतील प्रमुखांपैकीं एक इरिगेशन प्रॉजेक्ट, मोठ्यापैकीं जलविद्युतगृह, जलवाहतुकीचें साधन होणार आहे असें म्हणतात. सध्या दक्षिण हिंदुस्थानांत बऱ्याच अंशीं पूर्णत्वानें उपयोगांत आणलेली नदी म्हणजे म्हैसूरचें कनंबडी धरण व मद्रासचें मेट्टूर धरण यांनीं मंडित झालेली कावेरीच म्हणणेस हरकत नाहीं. तरी महाराष्ट्रीयांनीं सह्याद्रींत उगम पावणाऱ्या कोयना नदी, कारवारची काळी नदी व इतर लहान मोठ्या नद्या याबाबत स्वतंत्र योजना तयार करणें व त्या जनतेसमोर व सरकारसमोर ठेऊन त्या अंमलांत आणवून घेणेची निकड लावणें अगत्याचें असून वेस्टर्न व्हाटस फॉरेस्ट अँड मिनरल् युटिलायझेशनसंबंधी योजना तयार करण्यांत याव्या या उद्देशानें आमचे मित्र श्री. के. जे. तवनप्पा ह्यांनीं एक माहितीपूर्ण लेखमाला " अर्था "साठी लिहिली. त्यांच्या लेखमालेचा उद्देश त्यांच्याच शब्दांत वर सांगितला आहे.

त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, हैद्राबाद या संस्थानांनीं आपल्या भागाचें काम पुरें केलें आहे. आतां सह्याद्रीचे सान्निध्यांत राहणारे कर्नाटकीय व महाराष्ट्रीय यांनीं आपल्या भागाचें काम पुरें करणेचें राहिलें आहे. तरी त्या त्या भागांतील विचारवंत लोक योजना तयार करून जनतेसमोर मांडतील अशी अपेक्षा श्री. तवनप्पा ह्यांनीं व्यक्त केली आहे.

---

### १९४५ अखेरची तेजी

खालील तक्ता ऑक्टोबर ते जानेवारी १९४६ ह्या मुदतीमधील तेजीचें मान दाखवील.

| | आक्टोबर अखेर | जानेवारी १९४६ |
|---|---|---|
| डाईंग | १९८०–८५ | २२६३ |
| कोहिनूर | ६०१ | ७२०-२२ |
| सिंदिया | ३७ | ४८–४९ |
| कुलाबा | २४५ | ३९५ |
| बकिंगहॅम | ३४५ | ४०० |
| टिटाघर | ३२ | ४३ |
| सिमेंट | २३२ | २५६ |




ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत — किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मायखळा पुल, मुंबई नं. १७.
—— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ——


पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें !—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर. येथें प्रसिद्ध केलें.